# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१
Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎23742191 Fax : 23781061
ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in


## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१४

## अधिसूचना क्रमांक : १४७७(२)/२०१४/ तीन [जाहिरात क्रमांक : १२४-२०१४]

जाहिरात क्रमांक -१२३/२०१३, दिनांक १६ डिसेंबर, २०१३ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील विविध पदांवरील / सेवांमधील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. २ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१४** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१४ दिनांक ३०, ३१ मे व १ जून, २०१४** पासून **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या केंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांनी पूर्व परीक्षेकरिता देण्यात आलेल्या माहितीच्या आधारेच मुख्य परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

२. उपलब्ध पदसंख्या :-

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | **उपजिल्हाधिकारी, गट-अ (एकूण ४४ पदे)** | २१ | ६ | ३ | १ | १+१▼ | १ | १ | १ | ७+१▼ |
| | १४ महिला -* | ७ | २ | १ | -- | १ | -- | -- | -- | ३ |
| | १ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | १ पद अपंग -@ | @ क्षीणदृष्टी - १ पद | | | | | | | | |
| २ | **पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ (एकूण २४ पदे)** | १२ | **४** | -- | **१** | -- | **१** | **१** | **२** | **३** |
| | ७ महिला -* | ४ | **१** | -- | -- | -- | -- | -- | **१** | **१** |
| | १ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | **तहसिलदार, गट-अ (एकूण ३५ पदे)** | १२ | २+१▼ | २+१▼ | १+२▼ | १ | -- | १ | १ | ४+७▼ |
| | १२ महिला -* | ४ | १ | १ | १ | -- | -- | १ | -- | ४ |
| | १ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | १ पद अपंग -@ | @ चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- १ पद | | | | | | | | |
| ४ | **सहायक विक्रीकर आयुक्त , गट-अ (अनुशेषाची एकूण ६ पदे) ▼** | -- | -- | ५▼ | -- | -- | -- | -- | -- | १▼ |
| | २ पदे महिला -* | -- | -- | २ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | **उपमुख्य कार्यकारी अधिकारी /गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ९ पदे)** | ४ | २ | १+१▼ | -- | १ | -- | -- | -- | -- |
| | ३ पदे महिला -* | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | १ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | १ पद अपंग -@ | @ क्षीणदृष्टी - १ पद | | | | | | | | |
| ६ | **सहायक संचालक/महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (एकूण ७ पदे)** | ४ | -- | ३ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | २ महिला -* | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | **कक्ष अधिकारी , गट-ब (एकूण २ पदे)** | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ८ | **सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण ४६ पदे)** | २१ | ६+२▼ | ३ | १+१▼ | १+१▼ | १ | १ | १ | ७ |
| | १३ महिला -* | ७ | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | २ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | **सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब (एकूण १० पदे)** | ६ | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | ३ महिला -* | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | १ पद अपंग -@ | @ चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- १ पद | | | | | | | | |
| १० | **उपअधीक्षक, भूमि अभिलेख , गट-ब** (एकूण १९ पदे) | १३ | १ | ३ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | ६ पदे महिला -* | ४ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | १ पद खेळाडू -☑ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ११ | **उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण २ पदे)** | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | २ महिला -* | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १२ | **सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट ब (एकूण १ पद)** | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १३ | **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब (एकूण ३ पदे)** | २ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- |
| १४ | **नायब तहसिलदार, गट-ब** (एकूण २२७ पदे) | ९७ | ३४▼ | २२▼ | १▼ | ३▼ | ६▼ | १०▼ | ३▼ | ५१▼ |
| | ६८ पदे महिला -* | २९ | १० | ७ | -- | १ | २ | ३ | १ | १५ |
| | ११ पद खेळाडू -☑ | ५ | २ | १ | -- | -- | -- | १ | -- | २ |
| | ६ पदे अपंग -@ | @ क्षीणदृष्टी - १ पद, चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- २ पदे श्रवणशक्तीतील दोष - ३ पदे | | | | | | | | |

**टीप :-**

१.१ ▼ **अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत * अशी खूण केलेली पदे महिला आरक्षणाची आहेत, व ☑ अशी खूण केलेली पदे खेळाडू आरक्षणाची आहेत.**

१.२ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित दर्शविलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

१.३ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

१.४ उपरोक्त पदांपैकी कक्ष अधिकारी, गट ब वगळता अन्य सर्व पदांना विभागीय संवर्ग, संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली २०१० लागू आहे.

**२.** सदर परीक्षा खालील दोन टप्प्यांत घेण्यात येईल

(१) लेखी परीक्षा :- **एकूण ८०० गुण.** (२) मुलाखत :- **१०० गुण.**

**३. वयोमर्यादा :-**

३.१ उपरोक्त पदाकरिता दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(२) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(३) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(४) माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४. शैक्षणिक अर्हता :-**

४.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.२ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता भौतिकशास्त्र व गणित या विषयासह विज्ञान अथवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी

४.३ राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१४ ची माहिती अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक म्हणजे दिनांक ७ मे, २०१४ पर्यंत उमेदवार पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदवीसाठी अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल त्या पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक ७ मे, २०१४ पर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

४.४ सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

४.५ **पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ, उप अधिक्षक/सहायक आयुकत, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवारांची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे :-**

**(एक) पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**(दोन) उप अधिक्षक/सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**(तीन) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. (कमीत कमी) फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक, चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. | उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. |

४.६ उपरोक्त परीच्छेद क्रमांक ४.५ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

४.७ **अपंग उमेदवारांसाठी पात्रता** :- शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

५. **शुल्क** : **५.१** :- अमागास - **रु. ५१५/-** **५.२** :- मागासवर्गीय - **रु. ३१५/-**

६. **अर्ज करण्याची पद्धत** :-

६.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

६.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १७ एप्रिल,२०१४ ते ७ मे, २०१४ या कालावधीत** सादर करणे आवश्यक राहील.

६.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

६.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईलः-

६.६ **आयोगाने** निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

६.७ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

६.८ परीक्षा शुल्काचा **भरणा** करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क **भरण्याकरिता** मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "**Unpaid**" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "**Pay Now**" अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

६.९ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

८. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची पध्दत आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा विभागातील राज्य सेवा परीक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली राज्य सेवा परीक्षेबाबतची माहिती अधिकृत समजण्यात येईल.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ७ मे, २०१४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१०. चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ८ मे, २०१४** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

११. राज्यसेवा (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपल्ब्ध आहे.

**मुंबई.**
दिनांक : **१७ एप्रिल, २०१४.**

**श्री.शं.पाठक**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**